# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### विरार (जि.पालघर) येथील घरांना पाण्याची सोय न करताच सोडत काढण्यात आली असल्याबाबत

**(१) २४२१ (२३-१२-२०१४). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (जि.पालघर) येथील घरांना पाण्याची सोय न करताच सोडत काढण्यात आली असल्याचे माहे जून, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सोडतीतील ज्या नागरीकांना घरे प्राप्त झाली आहेत, त्यांना पाणीपुरवठा करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदर सोडत पाण्याच्या व्यवस्थेविषयी काढणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (२१-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन" कार्यक्रमांतर्गत वसई विरार महानगरपालिकेसाठी वाढीव १०० दश लक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेच्या पाणी पुरवठा (सुर्या टप्पा-३) योजनेस मान्यता दिली असून सदर योजनेची कामे प्रगतीवर आहेत. महापालिकेस सदर योजनेतून पाणी उपलब्ध झाल्यानंतर विरार-बोळींज येथे कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत (म्हाडा मार्फत) सुरु असलेल्या घरकुल योजनेस पाणी पुरवठा करणे शक्य होणार आहे.

---

**नागपूर शहरातील नंदनवन पोलिस स्टेशन अंतर्गत**
**पवनसुत नगर येथे झालेली चोरी**

**(२) ४६८५ (१५-०१-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील नंदनवन पोलिस स्टेशन अंतर्गत पवनसुत नगर येथे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुसऱ्या आठवड्यात तीन घरी भरदिवसा जबरीचोरी झाल्याची घटना दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोपींना मुद्देमालासह अटक करण्यात आलेली आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरात चौऱ्या व चेन स्नॅचिंग या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाल्याने महिलांमध्ये असुरक्षतेची भावना निर्माण झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूरातील गुन्हेगारी रोखण्याकरीता पोलिसांनी केलेल्या उपाय योजना काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) :** (१) नागपूर शहरातील नंदनवन पोलीस स्टेशन अंतर्गत सन २०१४ मध्ये दुसऱ्या आठवड्यात तीन घरी भरदिवसा जबरी चोरी झाल्याची घटना घडलेली नाही. तथापि, दिनांक १०.११.२०१४ रोजी एक घर फोडीचा गुन्हा घडलेला आहे.

(२) घर फोडींच्या घटनेत अपराध क्र. ४४३/१४ भा.दं.वि. कलम ४५४,३८० अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपी मिळून आलेला नाही.

(३) हे खरे नाही.

(४) नागपूर शहरात घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी गस्त पथकांची वाढ करण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांना देखील गस्त घालण्याचे निर्देश पोलीस आयुक्त यांनी दिले आहेत.

एप्रिल, २०१४ पासून गुन्हेशाखेच्या नियंत्रणात ४० कर्मचाऱ्यांचे विशेष, पथक, शस्त्र, वॉकी-टॉकी, मोटार सायकलसह दिवस रात्र दोन पातळीत गस्त लावण्यात आली आहे. सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हेशाखा नागपूर शहर येथुन दररोज ३ जिप गाड्या ज्यामध्ये पोलीसांची (महिला पोलीससह) गस्त लावण्यात आली आहे. तसेच वरिष्ठ अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस उप आयुक्त हे महत्वाचे वेळी स्वत: गस्तीवरील पोलीस कर्मचाऱ्यांची पाहणी करतात. तसेच नव्याने २३ पोलीस वाहने (पोलीस गस्तीपथक) लोकसदृश्य अशा महत्वाचे ठिकाणी नेमण्यात येऊन त्यांस नजिकचे संवेदनशील ठिकाणी गस्तीकरिता पाठविण्यात येते.

---

**वरळी, मुंबई येथील नेहरू तारांगणालगतच्या सुमारे १७ एकर**
**जमिनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत**

**(३) ५९४३ (०७-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप**

**(श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी, मुंबई येथील नेहरू तारांगणालगतच्या सुमारे १७ एकर जमिनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी मुंबई महानगरपालिका व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून कोणतीही परवानगी न घेता लोखंडवाला इन्फ्रास्ट्क्चने महानगरपालिका व एसआरएची बोधचिन्हे बेकायदा वापरून व शासनाच्या नावाचा गैरवापर करून रहिवाशांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, तद्नुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०३-१२-२०१५) :** (१) व (२) वरळी मुंबई येथील न.भू.क्र. १७/४७ (पै) या भूभागावर महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व.पु.) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क(१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना रागविण्यात शासनाने दि. १४.०८.२०१० रोजीच्या आदेशान्वये मंजूरी दिली आहे. त्यास अनुसरुन झापेडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि. .३१.१२.२०१२ रोजी विकासक म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेस व त्यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून मे. लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना आशयपत्र दिले होते. उक्त आशयपत्रातील अटीनुसार मे. लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी योजनेच्या ठिकाणी लावलेला नामफलक काढून टाकण्याबातच्या सुचना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास शासन पत्र दि. ०५.०५.२०१५ अन्वये देण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि. १८.०५.२०१५ पत्रान्वये सदरहू योजनेच्या ठिकाणी लावलेला नामफलक तातडीने काढून टाकण्याबाबत मे. लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना सुचना दिलेल्या आहेत

सदरहू योजनेच्या ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे बोधचिन्हाचा वापर केल्याचे आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे-बेलापूर औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांना खंडणी खोरांचा त्रास होत असल्याबाबत

**(४) ६८५१ (०७-०४-२०१५). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर औद्योगिक वसाहतीतील सुमारे ३५०० पेक्षा अधिक उद्योजकांना खंडणी वसूल करणाऱ्यांचा त्रास होत असून पैसे उकळणे, कंपनीचे बांधकाम होत असताना बांधकाम

साहित्य घेण्यापासून कामगार भरती पर्यंतच्या कामात दमदाटी करणे, भंगार साहित्यातही उद्योजकांकडून हिस्सा मागणे, भंगार चोरणे इत्यादी कारणामुळे उद्योजकामध्ये भिती दहशत निर्माण झाल्याने या त्रासातून मुक्तता व्हावी याकरिता माहे जुलै, २०१४ च्या सुमारास पोलीस आयुक्त नवी मुंबई यांना भेटून निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गुन्हेगारांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नवी मुंबइ औद्योगिक घटकातील उद्योजकांना खंडणी, दमदाटी, धमकी व इतर प्रकारे पैशचे मागणी करुन त्रास देणाऱ्या विरुध्द पुढीलप्रमाणे तात्काळ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाणे

१. गु.र.नं.२१७/२०१४ भा.द.वि.स. ३५८,३४१,१४३,१४४

२. गु.र.नं.२३५/२०१४ भा.द.वि.स. ३८४,४५२,१४३,३२३,५०४,५०६

३. गु.र.नं.२३७/२०१४ भा.द.वि.स. ४५२,३८५,५०६,३४

रबाळे एमआयडीसी या पोलीस ठाणे अंतर्गत

१. गु.र.नं.०४/२०१४ भा.द.वि.स. ३८४,३४१,५०४,५०६,३४

२. गु.र.नं.१११/२०१४ भा.द.वि.स. ४५२,३८४,३२३,५०४,५०६,३४

वरील गुन्ह्यातील अटक व निष्पन्न आरोपी यांचे विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सदर करण्यात आले आहेत. गुन्ह्यांच्या तपासाच्या अनुषंगाने सदर आरोपीविरुध्द वेळीच योग्य त्या प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच संबंधित उद्योजकांना नमून गून्ह्यांतील आरोपींना व इतर आज्ञात आरोपी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही, या दृष्टीने सर्वतोपरी दक्षता घेण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील पीएम पीएमएल परिवहन विभागात रिक्त पदे पूर्ण क्षमतेने भरणेबाबत

**(५) ८३३७ (०४-०४-२०१५). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पीएम पीएमएल परिवहन विभागात ७०६ धारक व १०२३ वाहकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, तसेच सदर रिक्त पदे पूर्ण क्षमतेने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

जेएनएनयुआरएम अंतर्गत व हप्तेबंद पध्दतीने ५०० नवीन बसेस होणार हे विचारात घेवून ७०६ चालक व १०२३ वाहक या पदांची जाहिरात दिली होती.

(२) परिवहन महामंडळाच्या ताफ्यामध्ये नव्याने दाखल होणाऱ्या बसेस विचारात घेऊन वाहक चालक भरतीची प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. तथापि नव्याने दाखल होणाऱ्या बसेस वेळेत न आल्याने तसेच महामंडळाच्या ताफ्यातील जुन्या बसेस कमी झाल्याने संचालक मंडळाने सदरची भरती स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतलेला होता.

(३) नव्याने येणाऱ्या बसेस नजीकच्या कालावधीमध्ये परिवहन महामंडळाच्या ताफ्यात जशा दाखल होती त्याप्रमाणे भरती करणेत येईल

(४) लागू नाही.

---

### वरळी, मुंबई येथील प्रभाग क्र. १९३ मधील झोपडपट्टीच्या पुनर्विकासाबाबत

**(६) ८८४२ (०७-०३-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी, मुंबई येथील प्रभाग क्र. १९३ मधील साईबाबा नगर, गणेश नगर डी व सी कमिटी, इंदिरा नगर, आंबेडकर नगर, नेहरु नगर, जे.आर.बोरीचा मार्ग, सानेगुरुजी नगर बी कमिटी, शक्ती नगर, जय भवानी नगर, जी.बी.सकपाळ मार्ग येथील वसाहतींचा पुनर्विकास गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्विकासात होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) उपरोक्त उपप्रश्न क्र. १ मधील नमूद वसाहतींचा पुनर्विकास मार्गी लागण्याच्या दृष्टीने शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-१२-२०१५) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण प्रभागातील जी.बी.सकपाळ मार्ग, सात रस्ता येथील श्री. साईबाबा नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेची योजना स्वीकृत आहे. गणेश नगर डी व सी. कमिटी, इंदिरा नगर, साने गुरुजी नगर बी कमिटी या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे काम प्रलंबित आहे. श्रमिक एकता फेडरेशन सहकारी गृहनिर्माण संस्था व आदर्श नगर एकता समता जनता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम पूर्ण झाले आहे. शक्तीनगर/जयभवानी नगर येथील झोपडपट्टी फुटपाथवर आहे.

(२) साईबाबा नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस दि. २१.०४.२०१५ रोजी आशयपत्र दिलेले आहे.

अन्य योजनांच्या संदर्भात परिशिष्ट-२ प्रमाणित करण्यासाठी विकासकाने कागदपत्रांची पुर्तता न करणे, ज्या योजना कारागृहापासून ५०० मीटर अंतरामध्ये येत आहेत अशा योजनांचा शासन निर्णय नगर विकास विभाग, दि. ०४.१२.२०१३ च्या तरतुदीनुसार स्थायी सल्लागार

समितीची अद्याप परवानगी न मिळणे या कारणांमुळे विलंब होत आहे. जय शक्तीनगर व जयभवानी नगर येथील झोपडपट्टयांचा समावेश साईबाबा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत समाविष्ट करण्यासाठी तेथील झोपड्यांची पात्रता तपासून पुरवणी परिशिष्ट-२ देण्याबाबत दिनांक १६.०७.२०१५ रोजी सहायक आयुक्त, जी/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविले आहे.
(३) उपरोक्त नमुद केल्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रमाणित परिशिष्ट-२ प्राप्त झाल्यानंतर व स्थायी सल्लागार समितीची पूर्व संमती मिळाल्यावर संबंधित योजनांना पुढील परवानग्या देण्यात येणार आहेत.

---

**शासनाने वर्ष २००० पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याबाबत**

**(७) १०५२२ (०७-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील दिनांक १० जानेवारी, २००० पर्यंतच्या झोपडयांना अधिकृत करण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०१४ च्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या या योजनेचा किती झोपडीधारकांना लाभ होणार आहे व आतापर्यंत झोपडयांना संरक्षण देण्याची मुदत ६ वेळा वाढवून दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने अनधिकृत बांधकामे नियमित केल्यास दोषी अधिकारी तसेच ठेकेदार व बिल्डर्स यांना संरक्षण मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्व अनधिकृत बांधकामे नियमित करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-१२-२०१५) :** (१) शासन अधिसूचना दि. २ मे, २०१४ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व.पु.) अधिनियम १९७१ मध्ये संरक्षणपात्र झोपडीवासियांसाठी अर्हता दिनांक १.१.१९९५ वरुन दि. १.१.२००० असा करण्यात आला आहे.
(२) दिनांक १.१.१९९५ ते दि. १.१.२००० या दरम्यानच्या कालावधीतील झोपडीवासियांची प्रकरणे सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रत्यक्षात तपासली जात नाहीत तोपर्यंत लाभार्थ्यांची संख्या निश्चित करणे अवघड आहे.

शासन निर्णय, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग दि. २७.०१.१९८९ अन्वये दि. १ मे, १९८० पर्यंतच्या मतदार यादीत नाव असलेल्या, शासन निर्णय दि. १ नोव्हेंबर, १९८९ अन्वये सन १९८५ पर्यंतच्या व शासन निर्णय दि. १६ मे, १९९६ अन्वये दि. १.१.१९९५ च्या मतदार यादीत नाव असलेल्या झोपडीवासियांना संरक्षण देण्यात आले होते. तद्नंतर दि. १.१.२००० पर्यंतच्या झोपडीवासियांना संरक्षण देण्यात आले आहे.

दरम्यानच्या कालावधीमध्ये अत्यावश्यक महत्वाच्या सार्वजनिक प्रकल्पापैकी एमयुटीपी, एमयुआयपी, मिठी नदी विकास व संरक्षण प्रकल्प, आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरण, धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी अनुक्रमे दि.१२ डिसेंबर, २०००, दि. १४ नोव्हेंबर, २००५,

दि. २२ सप्टेंबर, २००६ व दि.१७ एप्रिल, २००८ अन्वये दि. १.१.२००६ पर्यंतच्या झोपड्यांना पुनर्वसनासाठी पात्र करण्यात आले होते.

(३) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व.पु.) अधिनियम १९७१ च्या कलम ३Z (२) मधील तरतुदीनुसार अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यक्तीस व त्यास संरक्षण देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुध्द शिक्षा देण्याची तरतुद करण्यात आली आहे.

(४) वर नमुद केल्याप्रमाणे शासन अधिसूचना दि. २ मे, २०१४ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व.पु.) अधिनियम, १९७१ मध्ये सुधारणा करुन दि. १.१.२००० पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्यात आले आहे.

---

## मेट्रो रेल्वेच्या घाटकोपर ते वर्सोवा दरम्यानच्या रेल्वे स्थानकावरील ८७ स्टॉल पैकी ६१ स्टॉल अनधिकृत असल्याबाबत

**(८) ११२६३ (०८-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रो रेल्वेच्या घाटकोपर ते वर्सोवा दरम्यानच्या रेल्वे स्थानकावरील ८७ स्टॉल पैकी ६१ स्टॉल अनधिकृत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीएने सदर अनधिकृत स्टॉल निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत एमएमआरडीएने निर्णयात्मक कार्यवाही केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), व (४) घाटकोपर ते वर्सोवा या मेट्रो रेल्वेसंदर्भातील सवलतकराराप्रमाणे मुंबई मेट्रो वन प्रा.लि. यांना १०० चौ.मी. इतकी वाणिज्यीक जागा वापरण्यास मान्यता आहे. मेट्रो रेल्वेच्या घाटकोपर ते वर्सोवा दरम्यानचा रेल्वे स्थानकावर ४७ स्टॉल आहेत. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ अंतर्गत एकूण ४६ आस्थापना नोंदणीकृत असून के/पू विभागातील हद्दीतील एक आस्थापना बंद असल्यामुळे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे.

---

## नंदेश्वर (ता.मंगळवेढ, जि.सोलापूर) येथे स्वतंत्र पोलीस ठाणे मंजूर करण्याबाबत

**(९) १३७८२ (०७-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदेश्वर (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथे स्वतंत्र पोलीस ठाणे मंजूर करण्यात येऊनही अद्यापी स्वतंत्र पोलीस ठाणे बांधण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस ठाणे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे नागाव ता.अलिबाग येथील चार कुटुंबाना गावकीने वाळीत टाकल्याबाबत

**(१०) १४७२६ (०९-०४-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नागाव ता.अलिबाग येथील चार कुटुंबाना गावकीने वाळीत टाकल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास उघड झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अलिबाग पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देऊनही गुन्हा दाखल झाला नसल्याची बाब समोर आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) दिनांक ०५.०२.२०१५ रोजी शासकीय/पोलीस अधिकारी तसेच सरपंच तंटामुक्त अध्यक्ष यांची अर्जदार व गैर अर्जदार यांच्याबरोबर बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत दोन गटातील अध्यक्ष पदावरुन वाद असल्याचे निष्पन झाले. अर्जदार व गैरअर्जदार यांनी दिनांक ०१.०३.२०१५ रोजी दोन्ही पक्षातील वाद मिटला असल्याचा अर्ज पोलीस ठाण्यात येऊन दिला अर्जदाराच्या विनंतीवरुन तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापक समितीच्या गैरकारभाराची सीआयडी मार्फत चौकशी करण्याबाबत

**(११) १६३१० (१२-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापक समितीच्या गैरकारभाराची सीआयडी मार्फत चौकशी करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्र्यांनी गत सत्रात केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार सीआयडी मार्फत चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार याप्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे तसेच देवस्थानच्या जमिनी व मालमत्ता परत मिळविण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-११-२०१५) :** (१) होय.
(२) राज्य गुन्हे अन्वेषण विभाग परिक्षेत्र कोल्हापूर यांच्याकडून दि. २२.५.२०१५ पासून चौकशी सुरु आहे.
(३) सीआयडी चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील तुरुगांतील कैद्यांना विविध आजारांनी ग्रासले असल्याबाबत

**(१२) १६५८२ (१०-०८-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील तुरुगांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात ठेवलेल्या कैद्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेतली जात नसल्यामुळे तसेच मुंबई विभागातील १० तुरुंगामधील २५ टक्के कैद्यांना त्वचारोग व विविध आजारांनी ग्रासले असल्याचे माहे मे, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील तुरुंगातील कैद्यांना निकृष्ट दर्जाची व अपुरी साधनसामुग्री पुरविली जात असल्याबाबत तसेच आरोग्यविषयक समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०१५) :** (१) मुंबई मुख्यालय असलेल्या दक्षिण विभागामध्ये १० तुरुंग नसून ८ तुरुंग आहेत. त्यामध्ये त्वचारोगाने ग्रासलेल्या कैद्यांची टक्केवारी सुमारे ८% व इतर विविध आजराने ग्रासलेल्या कैद्याची टक्केवारी सुमारे ८% एवढी आहे.
(२) दक्षिण विभागाच्या कारागृहातील कैद्यांच्या आरोग्यविषयक तपासणी प्रयोजनार्थ काही कारागृहामध्ये वैद्यकीय अधिकारी / परिचारक/ मिश्रक अशी काही पदे मंजूर आहेत. ज्या कारागृहांमध्ये वैद्यकीय अधिकारी पद मंजूर नाही किंवा रिक्त आहे तेथील आजारी बंद्यांना वैद्यकीय तपासणी व औषधोपचारासाठी सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी या आठवड्यातून दोन वेळा कारागृहातस भेट देऊन औषधोपचार करतात. आजारी बंद्याकरता आवश्यक असणाऱ्या औषधांचा त्यांना मोफत पुरवठा करता येतो. कारागृहामध्ये शासकीय / निमशासकीय संस्थेमार्फत, पुरुष व महिला बंद्यांकरिता त्वचारोग, क्षयरोग, अस्थिरोग,

नेत्ररोग, दंतरोग या रोगांच्या तपासणी करीता शिबीरे तसेच व्यसनमुक्ती शिबीर व महिला बंद्यांकरीता स्त्रीरोग चिकित्सा शिबीर आयोजित केली जातात. प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे यांचेकडून मनोविकास तज्ञ येऊन ठाणे कारागृहातील मनोरुग्णांची तपासणी करुन औषधोपचार करतात. काही कारागृहात कारागृह नियमानुसार डेटल चेअर, व्हील चेअर, उच्च रक्तदाब मापक यंत्र, ब्लड शुगर मशिन, ब्लड सेल काउंटर मशिन, ब्लड बायोमेट्रिक मशिन, ऑक्सीजन सिलेंडर, ग्लोकोमीटर, इसीजी, नेबुलायझर इ. चांगल्या दर्जाची साधनसामग्री उपलब्ध आहे. काही कारागृहात आंतररुग्ण म्हणून कारागृहात दवाखाना आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) च्या दक्षिण भागातील नंदेश्वर येथे**
**पोलीस ठाण्याची निर्मीती करण्याबाबत**

**(१३) १६६८३ (१०-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) च्या दक्षिण भागातील नंदेश्वर येथे पोलीस ठाण्याच्या निर्मीतीचा प्रस्ताव गेली ५ वर्षे शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भाग सीमावर्ती भाग असून तेथील वाढत्या गुन्हेगारीला व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सदर पोलीस ठाणे कार्यान्वीत करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील माहिम रेल्वे स्थानक ते धारावी सेक्टर - ३ येथील**
**अभ्युदय बँकपर्यंत स्कायवॉक बांधण्याबाबत**

**(१४) १६७४७ (११-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील माहिम रेल्वे स्थानक ते धारावी सेक्टर - ३ येथील अभ्युदय बँकपर्यंत सुमारे ६५० मीटर लांबीचा स्कायवॉक म्हाडाच्या कार्यान्वित यंत्रणेद्वारे बांधण्यात येत असून या स्कायवॉकचे ३५६.४ मीटर लांबीचे बांधकाम अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्कायवॉकचे अर्पण असलेले बांधकाम पुर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) असल्यास, त्यासाठी निधी उपलब्ध झाला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
माहिम रेल्वे स्थानक ते धारावी सेक्टर ३ येथील अभ्युदय बँकेपर्यंत स्कायबॉलची लांबी ६५०.०० मीटर असून शासनाने उपलब्ध करुन दिलेलया १४.१२ कोटी निधीतून म्हाडातर्फे २९४.०० मीटर लांबीच्या स्कायबॉलचे काम म्हाडातर्फे पूर्ण होत आले आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
तथापि, उर्वरित (६५०.००-२९४.००) ३५६.०० मीटरचे स्कायबॉलचे काम करण्यासाठी आवश्यक असलेल्या २०.०० कोटी निधीची मागणी मार्च, २०१५ मध्ये म्हाडामार्फत शासनाकडे करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक मधील सिंहस्थ कुंभमेळयासाठी केंद्र शासनाकडून एक हजार कोटीचा निधी मिळण्याबाबत

**(१५) १६९३६ (११-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक मधील सिंहस्थ कुंभमेळयासाठी आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता केंद्र शासनाकडून एक हजार कोटीचा निधी मिळणार असताना केवळ १०० कोटी निधी मिळाला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आहे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कुंभमेळा संदर्भात शासनाने निधी उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :** (१) होय.
(२) सिंहस्थ कुंभमेळयासाठी निश्चित करण्यात आलेल्या रुपये २३७८.७८ कोटी आराखडयानुसारचा खर्च हा शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधीतून भागविण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नविन गृहनिर्माण धोरणामध्ये झोपडपट्ट्यांचा विकास होण्याबाबत

**(१६) १६९४५ (११-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नविन गृहनिर्माण धोरणामध्ये झोपडपट्ट्यांचा विकास करताना ७० टक्के रहिवाशांची संमतीपत्रांची अट शिथील करुन एसआरए साठी ५० टक्के संमतीपत्रांची अट मंजूर करण्याच्या प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-१२-२०१५) :** (१) गृहनिर्माण धोरण ठरविण्याच्या उद्दिष्टाने त्याच्या प्रारुप मसुद्याबाबत सन्माननीय लोकप्रतिनिधींकडून हरकती व सुचना मागविल्या होत्या. परंतू त्याविषयी अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

तथापि, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंदर्भात बैठकीस उपस्थित असलेल्या पात्र झोपटीधारकांपैकी ७० टक्के परंतु एकूण पात्र झोपाडीधारकांच्या संख्येच्या ५० टक्के पेक्षा कमी नाही या तत्वावर विकासकाच्या नियुक्तीबाबत बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ विनियम ३३(१०) सुधारणा करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्या दि. १२.०८.२०१५ रोजी झालेल्या १४ व्या बैठकीत ठराव क्र. १४/०४ मंजुर करण्यात आला आहे.

(२) व (३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मंजुर केलेल्या ठरावाप्रमाणे बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ विनियम ३३(१०) मध्ये सुधारणा करण्याविषयी प्रस्ताव प्राधिकरणाकडून दि. २२.०९.२०१५ च्या पत्रान्वये प्राप्त झाला असून विभागस्तरावर त्या प्रस्तावाची तपासणी करण्यात येत आहे.

---

### शासनाने गडचिरोली, चंद्रपूर या भागातील नक्षलवाद कमी करण्यासाठी निर्माण केलेल्या सी-६० तुकडी सवलतीचा लाभ २००९ पूर्वी वीरमरण आलेल्या जवानांच्या कुटुंबियांना देण्याबाबत

**(१७) १७०५२ (१५-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने गडचिरोली, चंद्रपुर या भागातील नक्षलवाद कमी करण्यासाठी स्थानिक जवानांचा अंतर्भाव असलेली सी-६० तुकडीची निर्मिती केली असून, तुकडीतील ९६ जवान, नक्षली हल्ले आणि चकमकीत ठार झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जवानांच्या कुटुंबियांना हुतात्मा बांधवाच्या कुटुंबियांना दिल्या जाणा-या सवलती, २५ लाख रुपये सानुग्रह अनुदान, तसेच घरासाठी २५ लाख रुपये आणि निवृत्ती पर्यंतचे वेतन दिले जाते सदर लाभ, २००९ पासून देण्यात येत असून, २००९ पूर्वी वीरमरण आलेल्या सी-६० या तुकडीतील जवानांच्या कुटुंबियांना देण्याच्या विचाराधीन बाबीवर शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०१५) :** (१) आतापर्यंत सी-६० पथकातील ६० पोलीस जवान नक्षल हल्ल्यात शहीद झाले आहेत.
(२) सदर बाब अद्याप शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जामखेड (जि. अहमदनगर) येथील जगदंबा कला केंद्रामध्ये दोन अल्पवयीन मुलींना वाम मार्गाला लावण्यात आल्याबाबत

**(१८) १७३१३ (१२-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामखेड (जि. अहमदनगर) येथील जगदंबा कला केंद्रामध्ये दोन अल्पवयीन मुलींना वाम मार्गाला लावल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जामखेड येथील घुंगरु व जगदंबा या दोन कलाकेंद्रामध्ये या मुलींना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास आणण्यात आले होते तेव्हापासून त्यांचे लैगिंक शोषण चालू होते या प्रकरणी सदरहू कलाकेंद्राची चालक भामाबाई किसन जाधव यांना अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशी करुन पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) फिर्यादी महिलेची इच्छा नसताना परपुरुषाची अनैतिक शारिरीक संबंध ठेवण्यास ३ आरोपींनी भाग पाडले म्हणून आरोपी विरुध्द जामखेड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६८/२०१५ भा.दं.वि. कलम ३७३, ३७६(१) बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३, ४, ५, ६, स्त्रीयांचा अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३, ४, ५, ६, अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायदर १९८९ या कायदा कलम ३(१) (१२), ३(२) (५) प्रमाणे

गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आले असून, अतिशिघ्र गुन्हा तपासावर असून, न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**झोपडीमुक्त मुंबईसाठी शासनाने झोपड्यांची पात्रता सरसकट निश्चित करण्याबाबत**

**(१९) १७३८८ (११-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती देण्यासाठी आणि झोपडीमुक्त मुंबईसाठी शासनाने मुंबईतील सुमारे १५ लाख झोपड्यांची पात्रता सरसकट निश्चित करण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब दिनांक ७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २००० सालापर्यंतच्या झोपड्यांची पात्रता निश्चित करण्याचा या निर्णयानुसार शासनाने पात्र-अपात्रतेच्या घोळात अडकलेल्या झोपू योजना मार्गी लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०३-१२-२०१५) :** (१) मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. १९.०३.२०१५ रोजी झालेलया वॉर रुमच्या बैठकीत बृहन्मुंबईतील झापेडपट्टी क्षेत्रात GIS सर्वे करण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व.पू) अधिनियम १९७१ मध्ये सुधारणा करुन संरक्षणपात्र झोपडपट्टीसाठी अर्हता दिनांक १ जानेवारी, १९९५ याऐवजी १ जानेवारी, २००० असा सुधारीत करण्यात आला आहे. त्यास अनुसरुन दि. १.१.२००० त्या पुर्वीच्या झोपडीत प्रत्यक्ष वास्तव्य असणाऱ्या झोपडपट्टीयासियांचा निवारा निश्चित करण्यासाठी शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दि. २२ जूलै, २०१४ अन्वये गार्मदर्शक तत्वे विहित केलेली होती. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्रता तपासण्याच्या कार्यपध्दतीत अधिक सुसुत्रता/सुलभता याची म्हणून उक्त गार्गदर्शक तत्वे अधिक्रमित करुन सुधारीत मार्गदर्शक तत्चे शासन निर्णय दि. १६ मे, २०१५ अन्वये निर्गमित केलेली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई वरळी बीडीडी चाळीच्या रखडलेल्या पूनर्विकासासाठी म्हाडाला काम न देता जाहिर निविदा काढण्याबाबत**

**(२०) १७४७५ (१२-०८-२०१५). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वरळी बीडीडी चाळीच्या रखडलेल्या पूनर्विकासासाठी म्हाडाला काम न देता जाहिर निविदा काढावी अशी येथील रहिवाशांची मागणी असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रहिवाशांच्या या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०३-१२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई शहरातील बी.डी.डी. चाळीच्या पुनर्बांधणीच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु असून या संदर्भात गृहनिर्माण भवन वांद्रे येथे दि. ७.५.२०१५ रोजी सादरीकरण करण्यात आले होते. सदर सादरीकरणा दरम्यान मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशांप्रमाणे विविध प्रशासकीय विभागांना कार्यवाही करण्यास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली शहरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबत**

**(२१) १७४८५ (१०-०८-२०१५). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली शहरात चैनस्कॅचिंग व चोरी घरफोड्यामुळे नागरिक प्रचंड हैराण झाले असून यावर उपाय म्हणून सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबतची मागणी नागरिकांकडून होत असल्याची बाब दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यास कल्याण-डोंबिवली महानगरपालिका दुर्लक्ष करीत असल्यामुळे येथील नागरिकांनी दिनांक ३ मे, २०१५ रोजी रस्त्यावर उतरुन भिक मांगो आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१५) :** (१) होय.
(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस वा अनुषंगाने आंदोलनाबाबतचे निवेदन प्राप्त झाले होते. तथापि, महानगरपालिकेमार्फत निवेदनकर्त्यास उत्तर देण्यात आल्याने प्रत्यक्षात आंदोलन करण्यात आले नाही.
(३) व (४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे. या कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन समंत्रक म्हणून मे. प्राईसवॉटरहाऊस कुपर्स प्रा.लि. या कंपनीस महानगरपालिकेकडून नियुक्त करण्यात आले असून त्यांच्याकडून कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे.

---

## पुणे महानगरपालिकेने गेल्या चार वर्षात विविध व्यायामशाळांमध्ये व्यायामचे साहित्य पुरविण्याबाबत

**(२२) १७६२८ (१०-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेने गेल्या चार वर्षात विविध व्यायामशाळांमध्ये व्यायामचे साहित्य पुरविण्यासाठी सुमारे साडेसात कोटी रु. खर्च केले आहेत यापैकी सव्वा कोटी रुपयांचे साहित्य हे केवळ १३-ब या एकाच प्रभागातील देण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एवढ्या मोठ्या रक्कमेचे व्यायाम शाळेचे साहित्य देताना शासनाने कोणते निकष वापरले आहेत वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०१५) :** (१) पुणे महानगरपालिकेने सन २०११-१३ ते सन २०१४-१५ या ४ वर्षात विविध व्यायाम शाळांमध्ये साहित्य पुरविण्यासाठी मध्यवर्ती भांडार विभागामार्फत रुपये ५.४१ कोटी रुपयांची व्यायाम साधने खरेदी केली आहेत.

यापैकी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या दोन वर्षाच्या कालावधीत प्रभाग क्रमांक १३-ब करिता रुपये ७२.४१ लक्ष रुपयाचे व्यायाम साहित्य खरेदी करण्यात आले आहे.
(२) पुणे महानगरपालिकेमार्फत व्यायाम साहित्य वाटप करताना यापूर्वी कोणतीही नियमावली /नियम नसल्याने विभाग/प्रभागांच्या मागणीप्रमाणे अंदाजपत्रकातील उपलब्ध निधीनुसार मध्यवर्ती भंडारा विभागाकडून निविदा प्रक्रीया राबवून व्यायाम साहित्य उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील दहिसर ते मानखुर्द हा मेट्रो रेल्वेचा दुसरा टप्पा व वडाळा ते कासारवडवली (जिल्हा ठाणे) हा मेट्रोचा पाचवा टप्पा भूयारी ऐवजी उन्नत करण्यासंबंधीचा प्रस्ताव**

**(२३) १८३०२ (११-०८-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसर ते मानखुर्द हा मेट्रो रेल्वेचा दुसरा टप्पा व वडाळा ते कासारवडवली (जिल्हा ठाणे) हा मेट्रोचा पाचवा टप्पा भूयारी ऐवजी उन्नत करण्यासंबंधीचा प्रस्ताव एमएमआरडीएने शासनाकडे सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा मेट्रोचा मार्ग भूयारी ऐवजी उन्नत करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१५) :** (१), (२) व (३) मुंबई मेट्रो रेल्वे मार्गाच्या प्रकल्पाच्या जलद अंमलबजावणीकरिता हाती घ्यावयाचा संभाव्य उन्नत मेट्रो मार्गाची तपासणी करण्याकरीता तसेच पुनर्विलोकन व सविस्तर प्रकल्प अहवाल अद्यावतीकरण करण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामध्ये दहिसर ते मानखुर्द मेट्रो-२ व वडाळा ते कासारवडवली मेट्रो-४ या मार्गाचा समावेश आहे. त्यापैकी मेट्रो मार्ग-२-टप्पा-१ दहिसर-डि.एन.आर. नगर या उन्नत मेट्रो मार्गास शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. मुंबई मेट्रो मार्ग-४ वडाळा-कासारवडवली या उन्नत मार्गाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोदावरी नदीच्या पाण्यात प्रमाणा पेक्षा जास्त रसायने सोडण्यात आल्याबाबत**

**(२४) १९१७७ (११-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक मधील गोदावरी नदीच्या पाण्यात प्रमाणा पेक्षा जास्त रसायने सोडण्यात आल्याने तसेच सांडपाण्यावर प्रक्रिया न करताच ते नदीमध्ये सोडण्यात येत असल्यामुळे पाण्यामधील ऑक्सीजन विरघळण्याची क्षमता नष्ट झाल्याने शास्त्रीय दृष्टया गोदावरी नदीत मासे मृत झाल्याने या प्रकरणी जबाबदार असणा-या संबंधितांवर मुंबई पोलिस अधिनियमानुसार कार्यवाही करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने नाशिक महानगरपालिकेला दिनांक १८ एप्रिल, २०१३ रोजीच्या सुमारास देऊनही नाशिक महानगरपालिकेने अद्याप काहीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :** (१) नाही.

मा.उच्च न्यायालयाने दि. १८.४.२०१३ रोजी अशा प्रकारचे आदेश दिलेले नाहीत. तथापि सदर याचिकेच्या वेळोवेळी झालेल्या सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत.
"गोदावरी नदीमध्ये नागरीकांनी कोणत्याही प्रकारचे प्रदुषण करु नये. अन्यथा मुंबई पोलीस ॲक्ट १९५१ नुसार कारवाई करणेत येईल, असे विविध ठिकाणी फलक लावणेत यावे."
(२) तसेच गोदावरी प्रदुषणाबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र. १७६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या पुर्ततेसाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

- नाशिक महानगरपालिका हद्दीतील ६ मलजलशुध्दीकरण केंद्रामार्फत सुमारे २७० द.ल.लि. प्रतीदिन इतक्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते.
- नाशिक महानगरपालिकेमार्फत बांधलेल्या मलनि:सारण केंद्रांच्या कार्यक्षतेबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने समाधानकारक असा अभिप्राय दिला आहे.
- मा.उच्च न्यायालयाने नदीपात्र स्वच्छ व प्रदूषणमुक्त करण्यासाठी केंद्र शासनाच्या NEERI या संस्थेस सल्लागार म्हणून नियुक्त केले आहे. तसेच विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीमार्फत गोदावरी प्रदूषणमुक्त करण्यासाठी विविध उपायय योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या सदनिका म्हाडाच्या नोंदणीमध्ये नसल्याबाबत

**(२५) १९२०४ (१०-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या गेल्या २५ वर्षापासून पडून असलेल्या ८० सदनिका म्हाडाच्या नोंदणीमध्ये आहेत, तथापि सदरच्या सदनिका कोठे आहेत याबाबतची माहिती उपलब्ध नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने काही चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, सदर सदनिकांचा शोध घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०३-१२-२०१५) :** (१) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार, त्यांच्यामार्फत बांधण्यात आलेल्या विविध प्रवर्गातील सदनिकांपैकी सद्य स्थितीत विखुरलेल्या स्वरुपाती एकूण ४६२ सदनिका रिक्त असून सदर सर्व सदनिकांची नोंद व माहिती म्हाडाकडे आहे. सदरहू सदनिकांपैकी शासन स्वेच्छाधिकारातील २ टक्के कोट्यातील २०२ सदनिका वगळता अन्य सदनिकांची वितरण प्रक्रीया चालू आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य पोलीस दलाचे अधुनिकिकरण करण्याबाबत**

**(२६) १९४२३ (१२-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य पोलीस दल आधुनिकीकरण योजनेअंतर्गत केंद्र शासनाने राज्याला सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ साठी अनुक्रमे रुपये ९२.९३ कोटी व ७४.९७ कोटी इतका निधी पुरवला आहे. परंतु गेल्या दोन वर्षापासून निधीचा वापर केला नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलिस दल आधुनिकीकरण करण्यासाठी आलेला निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच, पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) केंद्र व राज्य शासन पुरस्कृत पोलीस दल आधुनिकीकरण योजने अंतर्गत पोलीसांना अत्याधुनिक वाहने, दळणवळण यंत्रणा, शस्त्रे साधनसामुग्री पुरविण्यात येते. निवासी आणि अनिवासी इमारती उपलब्ध करुन देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक) शहरातील महानगरपालिकाने ठेकेदारांना कर वसूली करण्याचा ठेका दिल्याबाबत

**(२७) १९५५७ (१०-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील महानगरपालिकाने ठेकेदारांना कर वसूली करण्याचा ठेका दिला. परंतु परागमन कंपनीचे ठेकेदाराने रु.२००/- + ५०/- अशी संकीर्ण कर पावती केली मात्र त्यावर महानगरपालिकाचा शिक्का नसल्याचे आढळून आले, अशाप्रकारे बेकायदेशीर संकीर्ण कर वसुली पावती देणाऱ्या ठेकेदाराची तक्रार स्थानिक पोलीस स्थानकात केली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी बेकायदेशीर संकीर्ण कर वसूली पावती देणाऱ्या ठेकेदाराविरुध्द चौकशी होण्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी केली असता संबंधित दोषी ठेकेदारावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :** (१) मालेगाव महानगरपालिकेचे पारगमन शुल्क वसुलीचे कंत्राट मे.मेघा इंटरप्रायजेस यांना व दै. बाजार जागा संकिर्ण वसुलीचे कंत्राट मे. सिटीकेअर डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन मालेगाव यांना देण्यात आलेले होते.

दि. ९.११.२०१४ व दि. १.१.२०१५ रोजी पारगमन शुल्क वसुलीचा हायवे नाका येथे पारगमन वसुली कंत्राटदाराकडून पारगमन शुल्क रु. २००/- व्यतिरिक्त अन्य दै. बाजार फी. रु. ५०/- याचीही पसुली करण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले.

अशी वसुली करणाऱ्या कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांविरुध्द पवारवाडी पोलिस स्टेशन येथे गुन्हा क्र. २०/२०१४, दिनांक ०९.११.२०१४ व गुन्हा क्र. १/२०१५ , दिनांक ०१.०१.२०१५ अन्वये, गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) याप्रकरणी बेकायदेशीर संकिर्ण कर वसुली पावती देणाऱ्या ठेकेदाराची चौकशी करुन चौकशीअंती ठेकेदार दोषी आढळल्यास त्यांचेविरुध्द पुढील कार्यवाही करण्याच्या सुचना आयुक्त, मालेगांव महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीबाबत

**(२८) १९८६६ (११-०८-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रो-१ प्रकल्प लांबल्याने दरवाढीबाबत नेमलेल्या लुईस बरजर समुह (एलबीएस) समितीने लावलेले निकष सदोष व अहवाल कालबाह्य तसेच दिशाभूल करणारा असल्याचा दावा मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी (मेट्रो-१) कडून करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१५) :** (१) नाही.

(२) सदर प्रकल्पाच्या वाढीव खर्चाबाबत मुंबई मेट्रो वन प्रा.लि. व शासन सवलतकरार नाम्यानुसार लवादामध्ये (Arbitration) गेले आहे. शासनातर्फे व मुंबई मेट्रो वन प्रा.लि. तर्फे लवाद नेमण्यात आले असून त्यांचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मिठी नदीच्या साफसफाईचे काम वेळेत पूर्ण करण्याबाबत

**(२९) २०१६६ (११-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दि. २६ जुलै, २००५ च्या महाप्रलयानंतर मिठी नदीच्या सफाईचे २००६-२००७ पासून काम हाती घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिठी नदीच्या एकूण १७.८ कि.मी. लांबीपैकी ११.८ कि.मी. चा भाग महापालिकेचा आहे व ६ कि.मी. चा भाग एमएमआरडीएकडे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) मिठी नदीच्या एकूण लांबीपैकी ६ कि.मी. लांबीच्या भागातील गाळ काढणे व साफसफाई चे काम २००६-२००७ पासून एमएमआरडीएने हाती घेतले असून मागील ९ वर्षाने सुमारे ४७७ कोटी खर्च झालेले असतानाही आजमितीस एमएमआरडीएचे साफसफाईचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कामाची सद्य:स्थिती आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. प्राधिकरणामार्फत टप्पा - १ व टप्पा २- मध्ये आतापर्यंत रु ४५३.६५ कोटी इतका खर्च झाला आहे. यामध्ये मिठी नदी व वाकोला नाल्याचे रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत, सेवा रस्ते व सुशोभिकरण इ. कामांचा समावेश आहे. यामध्ये फक्त गाळ काढणे (खोलीकरण) व रुंदीकरण या कामांसाठी रु २०५.०३ कोटी इतका खर्च झालेला आहे.

(४) प्राधिकरणामार्फत सन २०१० मध्ये खोलीकरण व साफसफाईचे काम पूर्ण झालेले असून सन २०११ व सन २०१२ मध्ये पावसाळापूर्व गाळ काढण्याचे व वार्षिक देखभालीची कामे करण्यात आली आहेत. सन २०१३ पासून पावसाळापूर्व गाळ काढण्याची कामे मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरातील जीर्ण उपकर प्राप्त इमारतींपैकी ज्या इमारती आर्थिक दृष्ट्या दुरुस्तीच्या पलीकडे जातात त्यांचे भूसंपादन करण्याबाबत

**(३०) २०१६७ (११-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील जीर्ण उपकरप्राप्त इमारतींपैकी ज्या इमारती आर्थिक दृष्ट्या दुरुस्तीच्या पलीकडे जातात त्यांचे भूसंपादन करुन त्याठिकाणी विकास नियंत्रण नियमावली अन्वये पुनर्विकास प्रकल्प राबवून रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याची तरतूद असल्याने म्हाडाच्या मुंबई इमारत व पुर्नरचना मंडळाने (आरआर बोर्ड) या प्रमाणे १९८३ ते २००९ या कालावधीत मुंबईतील ताडदेव, माझगांव, भायखळा, शिवडी, लोअर परेल, लालबाग, प्रभादेवी, दादर, माहिम येथे २१ ठिकाणी भूसंपादन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) सदरहू भूसंपादन केलेल्या बहूतेक ठिकाणी खाजगी बिल्डरच्या सहभागाने पुनर्विकास प्रकल्प राबविण्यासाठी म्हाडामार्फत एनओसी देण्यात आली होती. परंतु अनेकांनी मुदत उलटूनही प्रकल्पांना सुरुवात केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) म्हाडाने सप्टेंबर, २०१२ मध्ये मुंबई शहरातील विकत घेतलेल्या आणि भुसंपादन केलेल्या अशा सर्व ठिकाणच्या प्रकल्पाविरोधात कारवाई थांबविली तसेच त्यानंतर दिनांक २४ ऑक्टोबर, २०१३ च्या म्हाडा प्राधिकरणाच्या बैठकीत सर्व एनओसी रद्द करून सर्वत्र स्वत:च प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,
(४) म्हाडाने संपादित केलेल्या २१ भूखंडामध्ये समाविष्ट असलेल्या बावला कंपाऊंडची जमीन म्हाडाने १९७७ मध्ये भारतीय विद्याभवन ट्रस्टकडून विकत घेतली होती व त्यावरील प्रकल्पाची एनओसी रद्द केल्याने रहिवाश्यांची सोसायटी आणि दर्शन डेव्हलपर्सने मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला असता त्या दाव्यावर दिनांक २५ मार्च, २०१५ रोजी निर्णय देताना उच्च न्यायालयाने म्हाडा व शासनाचा निर्णय अयोग्य ठरवत ४ आठवड्यात आपल्या निकालाचे पालन करण्याचे आदेश म्हाडाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) मुंबई उच्च न्यायालयाने बावला कंपाऊंडच्या संदर्भात दिलेल्या निकालानुषंगाने अन्य २० बिल्डरांना न्यायालयात यश मिळवले तर भूखंडही खाजगी विकासकाकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, म्हाडाने विकत घेतलेल्या व भूसंपादन केलेल्या सदरहू २१ ठिकाणी विनाविलंब म्हाडामार्फत पुनर्विकास प्रकल्प राबवून तो लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (२१-११-२०१५) :** (१) होय.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने मुंबई शहर बेटावरील भुलेश्वर, ताडदेव, माझगांव, भायखळा, लोअरपरळ, लालबाग, प्रभादेवी, दादर व माहिम येथील २३ मालमत्तांचे भूसंपदान केले असून त्यापैकी बावला कंपाऊंड ही मालमत्ता ही मंडळाने विकत घेतलेली आहे.

(२) बावला कंपाऊंड या मंडळाने विकत घेतलेल्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता शासनाच्या उच्चस्तरीय समितीकडून मिळविण्याकरिता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत मर्यादित ना-हरकत प्रमाणपत्र दिले होते. तर जुनी चिखलवाडी, ताडदेव या मालमत्तेच्या विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गतच्या पुनर्विकासाकरीता ना-हरकत प्रमाणपत्र दिले होते. व उर्वरित २१ प्रकरणांमध्ये विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गतच्या पुनर्विकासाकरीता इरादापत्र दिलेली होती. यातील बहुतेक ठिकाणी पुनर्विकासाची प्रक्रीया सुरु होवू शकली नाही. हे खरे आहे.

(३) होय.

(४) होय. तथापि, मा.उच्च न्यायालयाच्या दि. २५.०३.२०१५ रोजीच्या आदेशाविरुध्द म्हाडा/मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (एसएलपी) क्र. १३९३०-१३९३१/२०१५ दाखल केली असून, सदर एसएलपी सद्य:स्थितीत मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

(५) मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात मंडळाने विशेष अनुमती याचिका (एसएलपी) दाखल केली असल्याने, सद्य:स्थितीत तशी शक्यता नाही.

(६) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने भूसंपादित केलेल्या २३ मालमत्तांपैकी २२ मालमत्तांचा पुनर्विकास करण्यासाठी मंडळामार्फत दि. २१.१०.२०१४ रोजी म्हाडाच्या कंत्राटदारास आशयपत्र देण्यात आली असून उर्वरित एका प्रकरणी पूर्वीच्या कंत्राटदाराची नेमणूक रद्द करुन नव्याने आशय पत्र देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## ठाण्यात रहिवाशी संकुल उभारण्यासाठी झाडांची तोड केल्याबाबत

**(३१) २०३८४ (११-०८-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यात रहिवाशी संकुल उभारण्यासाठी तब्बल ५ हजार झाडांची तोड करण्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरण संरक्षणासाठी कटिबध्द असल्याच्या घोषणा राज्य सरकार करीत असतानाही दिवसा ढवळ्या ठाण्यातल्या कोलशेत मधल्या मौजे बालकुम येथील क्लॅरियंट

कंपनीच्या भल्ल्यामोठ्या पत्र्यांमागे हजारो झाडांची कत्तल रहिवाशी संकुलाच्या बांधकामासाठी विकासकाने केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सुमारे ३०० वर्षे जुनी झाडे तोडण्याची परवानगी ठाणे महानगरपालिकेने दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषी विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) उक्त प्रकरणी वृक्षाचे संरक्षण व जतन करण्याकरिता महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम १९७५ खाली ठाणे महानगरपालिकेअंतर्गत वृक्षप्राधिकरणाने विहित कार्यपध्दतीनुसार हरकती व सुचना मागवून प्राधिकरणाच्या दिनांक २४.४.२०१५ च्या बैठकीमध्ये ११० झाडे तोडण्यास मजुरी देण्यात आली.
(४) सक्षम प्राधिकरणाने विहीत कार्यपध्दतीनुसार परवानगी देण्यात आलेली असल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवीमुंबई शहरामध्ये कोपर खैराणे परिसरात २० मोबाईल टॉवर नोंदणी महानगरपलिकेकडे करण्यात न आल्याबाबत**

**(३२) २०४१५ (११-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई शहरामध्ये कोपर खैराणे परिसरात २० मोबाईल टॉवर पैकी १५ टॉवरची नोंदणी नवी मुंबई महानगरपलिकेकडे करण्यात आलेली नसल्याची बाब दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१५) :** (१) नाही.
नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोपरखैरणे विभागात एकूण १६२ .मोबाईल टॉवर्स आहेत. यापैकी मालमत्ता नोंदणी रजिस्टरनुसार माहे जुलै, २०१५ अखेरपर्यंत अस्तित्वात असलेल्या नोंदणीकृत मोबाईल टॉवर्सची संख्या १०२ इतकी आहे. तर उर्वरित ६० मोबाईल टॉवर्सची परवानगी सन २०१४ मध्ये संपुष्टात आली आहे.
(२) नवी मुंबई महानगरपालिकेकडून मोबाईल टॉवर्स कंपन्यांसोबत दि.०२/०७/२०१५ व दि.०३/०९/२०१५ रोजी झालेल्या बैठकांदरम्यान संबंधीत कंपन्यांना मोबाईल टॉवर्ससाठी

परवानगी घेण्याकरीता ४५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. ४५ दिवसांत ज्या कंपन्या मोबाईल टॉवर्ससाठी परवानगी घेणार नाहीत. त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील रॉयल कंस्ट्रक्शन या विकासकाने एस.आर.डी.ए.च्या योजनेतून उभारलेल्या इमारतीला ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत**

**(३३) २०५१९ (१२-०८-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील रॉयल कंस्ट्रक्शन या विकासकाने एस.आर.डी.ए.च्या योजनेतून तलावपाली परिसरातील ७ इमारती उभारुन सन २००४ ला पुर्ण करुनही सदर इमारतींचा ओ.सी.सर्टीफिकेट, सी.सी. प्लॉन कॉपी संबंधित इमारतीच्या फ्लॅट धारकांना मागणी करुनही देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी फ्लॅट धारकांनी वेळोवेळी मागणी करुनही विकासकाने महानगरपालिकेला भरणा करावयाची आवश्यक रक्कम भरण्यास टाळाटाळ करीत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाकडून सदर विकासकावर कारवाई करण्यात आली आहे काय, कारवाईचे स्वरुप काय,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१५) :** (१) मे.रॉयल कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी त्यांच्याद्वारे राबविण्यात आलेल्या एसआरडी योजनेंतर्गत आवश्यक ते शुल्क ठाणे महानगरपालिकेस भरणान केल्याने झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गतच्या पुनर्वसन घटक व विक्री घटक इमारतींना अद्याप वापर परवाना (O.C.C) देण्यात आलेले नाही.
(२) व (३) ठाणे महानगरपालिकेद्वारे आवश्यक शुल्कांचा भरणा करण्याबाबत संबंधित विकासकास दि. २०.१२.२०१३ रोजी सुचित केले आहे. तद्नुतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांमध्ये ठाणे महानगरपालिकेचा समावेश करण्यात आल्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांमार्फत दि. २८.०९.२०१५ व दि. १५.१०.२०१५ रोजी शुल्क भरण्यासाठी विकासकास कळविण्यात आलेले आहे. तथापि, आवश्यक शुल्कांचा भरणा विकासकाने अद्याही न केल्याने संबंधित विकासकाविरुध्द उचित कार्यवाही करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना कळविण्यात आलेले आहे. पुढील कार्यवाही ठाणे महानगरपालिकेकडून अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई रस्ते सफाईच्या कामाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(३४) २१२७६ (११-०८-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईमध्ये ठाणे, बेलापूर, पाम ब्रिज व इतर कॉक्रीटच्या रोडची यांत्रिकी पध्दतीने सफाई करण्यासाठी महानगरपालिकेने परिमंडळ निहाय दोन ठेकेदारांची नियुक्ती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रमुख रोडवरील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी माहे ऑक्टोबर, २०१२ पासून हे काम सुरु आहे मात्र, अनेक वेळा ही वाहने धुळ साफ न करता रोडवरुन जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे, बेलापूर, पाम ब्रिज सह शहरातील प्रमुख रस्त्याची यांत्रिकी पध्दतीने सफाई करण्यासाठी महानगरपालिका प्रत्येक महिन्याला ५० ते ६० लाख रुपये खर्च करत आहे, ठेकेदार काम चुकारपणा करत असुन अनेक वेळा वाहने फक्त कि.मी. वाढविण्यासाठी फिरविली जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार दोषी ठेकेदारांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख रस्त्यांचे यांत्रिकी पध्दतीने करण्यात येणाऱ्या सफाई कामाचे मुल्यांकन प्रत्यक्षात करण्यात आलेल्या प्रति किलोमिटर रस्ते सफाईनुसार केले जाते. हे काम निविदेतील अटी/शर्तीनुसार कंत्राटदारांमार्फत केले जाते.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगांव महानगरपालिकेच्या जलवाहिनी गळतीच्या दुरुस्तीबाबत

**(३५) २१७०३ (११-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव महानगरपालिकेने सन २०११ पासून आतापर्यंत जलवाहिनी गळतीच्या दुरुस्तीवर सुमारे ४ कोटी ५० लक्ष रुपये खर्च केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीपुरवठा विभागात कुशल मनुष्यबळ व यंत्रणा असतानाही दुरुस्तीची कामे ठेकेदारांकडून करुन घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००८ ते २०१४ या कालावधीतील कामकाजाची चौकशी सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, चौकशी करुन दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :** (१) जळगाव महानगरपालिकेमार्फत शहरातील मुख्य जलवाहिनी व वितरण वाहिनीवरील गळतीच्या दुरुस्तीसाठी माहे जानेवारी, २०११ पासून ३१ जुलै, २०१५ पर्यंत रुपये २,२५,१.,४९३/- इतका खर्च करण्यात आला आहे.

यापैकी रुपये २,०३,०९,८३५/- इतका खर्च मुख्य जलवाहिनी दुरुस्तीसाठी व रुपये २२,३३,६५८/- इतका खर्च वितरण वाहिनीवरील दुरुस्तीसाठी करण्यात आला अशी वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे नाही.

मुख्य जलवाहिनी दुरुस्ती कामासाठी आवश्यक असणारे तांत्रिक कुशल मनुष्यबळ व यंत्रणा महानगर, पालिकेकडे उपलब्ध नाही. त्यामुळे या कामासाठी रितसर निविदा प्रसिध्द करुन, त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेऊन, ठेकेदारामार्फत कामे करुन घेण्यात येतात.

तसेच, शहरातील वितरण वाहिन्या दुरुस्तीसाठी महानगरपालिकेकडील उपलब्ध मनुष्यबळाचा वापर करुन, दुरुस्तीची कामे करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जिल्हा रायगड) नगरपालिका हद्दीतील ४१ धोकादायक इमारतींना देण्यात आलेल्या नोटीसांबाबत**

**(३६) २१७५२ (११-०८-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि. रागयड) नगरपालिका हद्दीतील धोकादायक व अती धोकादायक ४१ इमारतीना नगरपालिका प्रशासनामार्फत नोटीस देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्यापूर्वी सदर इमारती दुरुस्ती करण्यात येणार आहेत काय,
(३) नसल्यास, पनवेल नगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतींबाबत कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-११-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पनवेल नगरपरिषदेने एकूण ४६ धोकादायक व अती धोकादायक इमारतींना नोटीसा दिल्या आहेत.

(२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ च्या तरतूदीनुसार संबंधित इमारतीचे मालक/भोगवटादार यांनी दुरुस्ती करणे अपेक्षित आहे.

(३) नगरपरिषदेच्या नियोजन प्राधिकरण क्षेत्रामध्ये एकूण ४६ इमारती धोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. त्यांची माहिती नजिकच्या पोलिस स्टेशनला देण्यात आली आहे. त्यापैकी ५ इमारतींची दुरुस्ती करुन वापर सुरु केला आहे. ११ इमारतीचा वापर बंद केला आहे व ३० इमारतीचा वापर सुरु आहे.

ज्या इमारतीचा वापर सुरु आहे. त्यांचा विद्युतपुरवठा, पाणी कनेक्शन बंद करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. व धोकादायक इमारतींचा वापर बंद करणेबाबत शोध कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील २ लाख ६० हजार ८३३ बालके आधारकार्डविना असल्याबाबत**

**(३७) २२०२७ (१२-०८-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शून्य ते पाच वयोगटातील १ लाख ८६ हजार ८७० तर ६ ते १४ वयोगटांतील ७३ हजार ९६३ अशी एकूण २ लाख ६० हजार ८३३ बालके आधारकार्डविना असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने बालकांच्या आधारकार्डसाठी ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची मोहिम सुरु केली असून जून अखेर सर्वांना आधारकार्ड देण्याचे उदिष्ट असतांनाही यंत्रणा कमी पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१२-२०१५) :** (१) कोल्हापूर जिल्हयात मे, २०१५ अखेर ० ते ५ वयोगटातीजल ९२,०२८ आणि ६ ते १४ वयोगटातील १,६१,५७७ अशा एकूण २,५३,६०५ बालकांची आधार नोंदणी झाली नसल्याचे दिसून आले आहे.

(२) आधारकार्ड काढण्याकरिता अंगणवाडी केंद्रात मोहिम सुरु करण्यात आली, उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या पुणे खंडपीठाने पुणे महानगरपालिकेने संभाजी उद्यानात सुरु केलेले निसर्ग परिचय केंद्राचे बांधकाम पाडून टाकण्याचा आदेश दिल्याबाबत

**(३८) २२३०७ (११-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या पुणे खंडपीठाने पुणे महानगरपालिकेने संभाजी उद्यानात सुरु केलेले निसर्ग परिचय केंद्राचे बांधकाम पाडून टाकण्याचा आदेश दिले असल्याची बाब दिनांक ९ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे महानगरपालिकेचा सुमारे दीड कोटी रुपयांचा खर्च वाया जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उद्यानाच्या एकूण क्षेत्रापैकी पंधरा टक्के जागेमध्ये बांधकामाचे परिपत्रक सन १९९९ मध्ये महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी कोण्ात्या आधारावर काढले होते व अशा चुकीच्या पध्दतीने केलेल्या परिपत्रकाबद्दल दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या पुणे खंडपीठाने दिलेलया सदर निर्णयाविरुध्द पुणे महानगरपालिकेने मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल क्र. ५९५२/२०१५ अन्वये सिव्हील अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या प्राप्त आदेशामध्ये पुणे महानगरपालिकेस मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे खंडपीठ यांचेकडे फेर अपिल करणेसाठी आदेश प्राप्त झाल्यामुळे पुण महानगरपालिकेमार्फत फेर अपिलाबाबतची कार्यवाही चालू आहे.

सन १९९७ च्या मान्य विकास नियंत्रण नियमावली मधील नियम १३.३.१.३.२. नुसार ओपन स्पेसवर तळ मजला १० टक्के व पहिला मजला ५ टक्के प्रमाणे अनुज्ञेय १५ टक्के बांधकामानुसार तत्कालीन परिस्थितीमध्ये प्रस्तुत परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. सदर परिपत्रक विकास नियंत्रण नियमावलीशी सुसंगत असल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव येथे शिक्षण मंडळातर्फे आरक्षणानुसार मागासवर्गीय कर्मचा-यांना पदोन्नती मिळण्याबाबत

**(३९) २२५२१ (३०-०७-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव येथे शासनाच्या नियमानुसार शिक्षण मंडळातर्फे आरक्षणानुसार मागासवर्गीय

कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळणे आवश्यक असतानाही खुल्या वर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबत सहाय्यक आयुक्त नाशिक यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ८ फेब्रुवारी रोजी सेवक निवड समितीच्यानुसार बिंदू नामावली व अनुशेषानुसार पदोन्नती दिलेली नसून याबाबत अनेक चुका असल्यामुळे संपूर्ण प्रक्रिया थांबलेली आहे तसेच शिक्षकांचे पगार ही अद्‌याप झालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :** (१) जळगाव येथे शिक्षण मंडळातर्फे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांऐवजी खुल्या वर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही.

तथापि, दि. ८.२.२०१० रोजी झालेल्या सेवक निवड समितीच्या मान्यतेनुसार बिंदू नामावली मागासवर्गीय कक्षाकडून प्रमाणित न करता कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.

निवड समितीने मान्यता दिल्यानंतर बिंदूनामावली मागासवर्ग कक्षाकडून प्रमाणित करण्यापूर्वी, पदोन्नती आदेश पारीत करण्यासंदर्भात संबंधित जबाबदार अधिकारी, यांचेवर १ महिन्यात नियमानुसार कार्यवाही करण्याची, व त्याचप्रमाणे बिंदुनामावली प्रमाणित न करता, पदोन्नती दिलेल्या शिक्षकांची पात्रता तपासून, अपात्र शिक्षकांच्या संदर्भादेखील महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) होय.

(३) व (४) सेवक निवड समितीच्या मान्यतेनंतर बिंदुनामावली मागसवर्ग कक्षाकडून प्रमाणित न करता पदोन्नती देण्यात आली आहे.

तसेच शिक्षकांचे पगार माहे मे, २०१४ पर्यंत पूर्णत: अदा करण्यात आलेले असून, शासन अनुदान ५० % वेतन नियमितपणे अदा करण्यात येत आहे. महानगरपालिका हिस्सा ५०% वेतन माहे जून २०१४ पासून प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगांव शहरातील सराफ बाजारातील रस्त्यांच्या नुतनीकरणाबाबत

**(४०) २२५२६ (१७-०८-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरातील सराफ बाजारातील रस्त्यांचे नुतनीकरण काम चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेकेदाराच्या वेळकाढू धोरणामुळे नुतनीकरण काम अत्यंत संत गतीने चालू आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळ्यापूर्वी काम झाल्यास सराफ बाजारामध्ये व्यापारी व ग्राहक यांना तिथे जाणे अशक्य होणार आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, पावसाळ्यापूर्वी काम होणे जरुरीचे असल्याने शासन त्याकडे गंभीरपणे लक्ष देणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

जळगाव शहरातील सराफ बाजारातील २०८ मीटर लांबीच्या रस्त्याचे कामास जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी रक्कम रुपये १४,९५,०००/- च्या खर्चास आमदार निधी अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिली असून, सदर कामाचे रितसर निविदा प्रसिध्द करुन , सदरचे काम पावसाळयापूर्वी म्हणजेच दिनांक ३०.०५.२०१५ रोजी पुर्ण केलेले आहे मक्तेदारास झालेल्या कामाचे देयक अदा करण्यात आलेले आहे.

जळगाव शहर महानगरपालिकेच्या, शहर अभियंता यांनी पूर्ण झालेल्या रस्त्याचे काम तांत्रिक दृष्टया योग्य असल्याचे प्रमाणपत्र दिलेले आहे.

(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्हयात महा-ई सेवा केंद्र चालक आधार कार्डच्या नोदणीसाठी नागरिकांकडून २०० ते २५० रुपये आकारत असल्याबाबत

**(४१) २३५७४ (१२-०८-२०१५). श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शासनाच्या विविध योजनांकरिता आधारकार्ड बंधनकारक केलेले असल्याने याचा फायदा घेत महा-ई सेवा केंद्र चालक आधार नोंदणीसाठी नागरिकांकडून २०० ते २५० रुपये आकारत असल्याच्या तक्रारी पुणे जिल्हा प्रशासनाकडे माहे मे, २०१५ च्या सुमारास करण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीनुसार केंद्र चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०१५) :** (१) होय, माहे मे २०१५ ते ऑगस्ट २०१५ पर्यंत पंधरा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) पंधरा तक्रारी पैकी एका तक्रारीमध्ये ऑपरेटरला १८० दिवसाकरिता निलंबित करण्यात आले आहे. दहा तक्रारींमध्ये संबंधित ऑपरेटर यांची सेवा कायमस्वरुपी संपुष्टात आणून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. एका तक्रारीमध्ये महा ई सेवा केंद्र रद्द करण्यात आले आहे. एका तक्रारीमध्ये UID कीट ताब्यात घेण्यात आले आहेत. याशिवाय, आधार कार्ड

नोंदणी विनामुल्य असल्याबाबतचे फलक लावण्याच्या सूचना आधार कार्ड नोंदणी केंद्रांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील बेकायदा वृक्षतोड**

**(४२) २३६६४ (११-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिका हद्दीती दशनाम गोस्वामी संस्थेने पाच महिन्यांपूर्वी बेकायदा वृक्षतोडप्रकरणी महापालिकेच्या न्यायालयातून साक्षीदारांनाच पळवून नेण्याचा प्रकार निदर्शनास आल्यानंतर याच प्रकरणाचा चौकशी अहवालच गहाळ झाल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक १३ मे, २०१५ रोजी उघडकीस आला आहे, हे खरे आहे का,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वृक्ष प्राधिकरणाच्या निर्णयावरील आक्षेपांवर आयुक्तांनी सुनावणी घेणे बंधनकारक आहे. परंतु, आयुक्त हे सुनावणीला उपस्थित राहत नाहीत, हे ही खरे आहे का,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास दोषींवर कुठली कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्व साधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०१५) :** (१), (२) व (३) सदरहू प्रकरणी नस्ती गहाळ झाल्याने, डेक्कन पोलिस स्टेशन, शिवाजीनगर, यांचेकडे दिनांक १२.५.२०१५ रोजी अदखलपात्र गुन्हयांची नोंद करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द जबाबदारी निश्चित करण्याबाबत पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील इंद्रलोक रोडवरील भूखंडावर खेळाचे मैदानासाठी आरक्षण केल्याबाबत**

**(४३) २४६६४ (१०-०८-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील इंद्रलोक रोडवरील भूखंडावर आरक्षण क्र.११९ नुसार खेळाचे मैदानासाठी राखीव ठेवण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच त्या ठिकाणी रमाबाई इंडस्ट्रियल इस्टेट व गायत्री इंडस्ट्रियल इस्टेट या नावाने २८ गाळे बेकायदेशीररित्या बांधले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१५) :** (१) होय,

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र. ११९ हे खेळाच्या मैदानाकरीता आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र १६८०० चौ.मी. असुन त्यापैकी ११७८७.९८ चौ.मी. क्षेत्र मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

(२) होय,

सदरच्या ठिकाणी ग्रामपंचायत अस्तित्वात असल्याच्या कालावधीत रमाबाई इंडस्ट्रियल इस्टेट बी व गायत्री इंडस्ट्रियल इस्टेट ए व बी यांच्या नावाने २८ गाळे बेकायदेशीरपणे बांधण्यात आले होते.

(३) व (४) सदर ठिकाणी असलेल्या २८ अनधिकृत गाळयांपैकी २३ गाळयांवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून यापूर्वीच तोडक कारवाई करण्यात आली आहे. उर्वरित ५ गाळयांबाबत न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्याने सदर गाळयांवरील कारवाई अद्याप प्रलंबित असल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदी महानगरपालिका यांनी कळविले आहे.

---

## शासनाने नवीन गृहनिर्माण धोरणाच्या अनुषंगाने एस.आर.ए. अंतर्गत झोपडीधारकाच्या पात्रतेच्या पुराव्याची संख्या कमी करण्याबाबत

**(४४) २५०७७ (११-०८-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नवीन गृहनिर्माण धोरणाच्या अनुषंगाने एस.आर.ए. अंतर्गत झोपडीधारकाच्या पात्रतेच्या पुराव्याची संख्या कमी करणे, पुणे, मुंबई, नागपूर येथील झोपड्यांचे सर्वेक्षण एक वर्षात पुर्ण करण्यासाठी खाजगी सर्वेक्षक नेमणे इत्यादी अनेक सुधारणा करुन कोणत्याही परिस्थितीत परवडणारी घरे निर्माण करण्याचा सन २०१५-१६ दरम्यान शासनाचा संकल्प आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वच प्रकरणात अर्थात प्रकल्पबाधित झोपडीधारकांच्या पात्रतेच्या सरलता, सुलभता तसेच सहज उपलब्धता लक्षात घेऊन पुराव्यांची संख्या ठरविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील केंद्र तसेच राज्य शासनाच्या मालकीच्या जमिनीवर अंदाजे १५ लाखाच्या आसपास झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण झोपडपट्टी पुनर्वसन विभागामार्फत आगामी सहा महिन्यात करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यातील प्रत्येक प्रकल्पासाठी तांत्रिक- वाणिज्यिक व्यवहार्यता अहवाल तयार करण्यात येऊन सदर जमिनीवरील झोपडपट्टीवासियांचे तसेच पुनर्वसन करायचे की अन्यत्र हलवायचे याचा निर्णय घेतला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरील प्रकरणी आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा प्रस्तावित आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-१२-२०१५) :** (१), (२) व (३) गृहनिर्माण धोरण ठरविण्याच्या उद्दिष्टाने त्याच्या प्रारुप मसुद्याबाबत सन्माननीय लोकप्रतिनधिकडून हरकती व सुचना मागविल्या होत्या. परंतु त्याविषयी अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

तथापि, मुंबई व ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांच्या दि. १२.०८.२०१५ च्या १४ व्या बैठकीत प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील झोपडपटट्यांचे कालबध्द सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी प्राधिकरणाने निविदा मागवून ३ खाजगी एजन्सीची निवड केली असून त्यांना दि. ३०.१०.२०१५ रोजी इरादापत्रे दिलेली आहेत.

त्याचबरोबर झोपडीवासियांच्या पात्रतेसंदर्भात शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दिनांक २२.०७.२०१४ अन्वये मार्गदर्शक तत्वे विहित केली होती. झोपडीवासियांच्या पात्रतेची कार्यवाही सुलभ करण्यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून प्राप्त प्रस्तावास अनुसरुन शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, दि. १६.०५.२०१५ अन्वये सुधारित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत.

(४) व (५) गृहनिर्माण धोरण ठरविण्याच्या उद्दिष्टाने अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नसल्यामुळे याबाबत कार्यवाही झालेली नाही.

---

**जळगांव शहरातील नेरी नाका, शिवाजी नगर, मेहरूण आदी ठिकाणच्या स्मशानभूमीत अत्यंविधीसाठी लागणारे लाकूड मोफत मिळत नसल्याबाबत**

**(४५) २५२९१ (१०-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश भोळे (जळगांव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अत्यंविधीसाठी लागणारे लाकूड गेल्या वर्षभरापर्यंत जळगांव शहरातील नेरी नाका, शिवाजी नगर, मेहरूण आदी ठिकाणच्या स्मशानभूमीत मोफत मिळत होते, मात्र वर्षभरापूर्वीपासून आता सर्वसामान्य नागरिकांना अत्यंविधीसाठी १५०० रुपये खर्च करुन लाकडे विकत घ्यावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक नगर येथे अंत्यविधीसाठी लाकडे मनपाकडून उपलब्ध करुन दिली जातात मात्र जळगांव येथे लाकडे विकत घ्यावी लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगांव महानगरपालिकेकडून मोफत लाकडे अंत्यविधीसाठी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :** (१) होय.

जळगाव महानगरपालिकेमध्ये अंत्यविधीसाठी मोफत लाकडे पुरविण्याची योजना नगरपरिषद असल्यापासून चालू होती.

तथापि, स्थानिक निधी लेखा-परिक्षणामध्ये याबाबत आक्षेप नोंदविण्यात आला असल्याने, तसेच, जळगाव महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने, सदर योजना सद्य:स्थितीत राबविण्यात येत नाही.

(२) नाशिक येथे अंत्यविधीसाठी मोफत लाकडे पुरविण्यात येत असली तरी, अहमदनगर येथे सदर योजना सद्य:स्थितीत बंद करण्यात आली आहे.
(३) जळगाव महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने, ही योजना राबविणे शक्य होत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव शहरातील जोशी पेठ लगतच्या बागवान मोहल्ल्यात दूषित पाणी पुरवठा होत असल्यामुळे काविळीची लागण पसरल्याबाबत**

**(४६) २५२९३ (१०-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश भोळे (जळगांव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव शहरातील जोशी पेठ लगतच्या बागवान मोहल्ल्यात दूषित पाणी पुरवठा होत असल्यामुळे त्या परिसरात काविळीची लागण पसरली असून नवजात बालिका व विवाहितेचा मृत्यू झाला असल्याचे माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत महानगरपालिकेकडे तक्रार करुनही संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांची गांभीर्याने दखल घेतलेली नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०१५) :** (१) जळगाव शहरातील जोशी पेठ लगतच्या बागवान मोहल्ल्यात काविळ या रोगाची साथ पसरली असल्याची बाब माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली होती.

सदर परिसरातील एका गरोदर महिनेने मृत बालिकेला जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगाव येथे जन्म दिला. तद्नंतर सदर महिलेचा मृत्यू दिनांक २६.०५.२०१५ रोजी औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात झाला असून, त्या रुग्णालयाच्या प्रोव्हिजनल कॉज ऑफ डेथ सर्टिफिकेटनुसार सदर महिलेचा मृत्यू सेप्टीसेमियामुळे झाला.
(२) जळगाव महानगरपालिकेमार्फत दुषित पाणी पुरवठा होत असल्याची कोणतीही तक्रार सदर घटनेनंतर वा त्यापुर्वी माहे मे, २०१५ मध्ये महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.

जळगाव शहरास पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याची नियमित तपासणी करण्यात येत असून, त्यानुसार शहरात वितरीत होत असलेला पाणी पुरवठा शुध्द व पिण्यास योग्य असल्याचे दिसून येते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील ३८ खासगी रुग्णालयांमध्ये अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(४७) २५४८० (११-०८-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील तब्बल ३८ खासगी रुग्णालयांमध्ये अनधिकृत बांधकाम केल्याची बाब माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे साडेसहा हजार चौरस मीटर क्षेत्रावर अतिक्रमण झाले असताना केवळ ८०० चौरस मीटर अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे शहरातील ५१ खाजगी रुग्णालयाची पाहणी केल्यापैकी २४ हॉस्पिटलमध्ये अनधिकृत बांधकाम आढळून आले आहे.

(२) पाहणीमध्ये एकूण ६,६०४ चौ.मी. क्षेत्र अनधिकृत बांधकाम निदर्शनास आले असून, त्यापैकी ३,६५५ चौ.मी. अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली असून, २५६ चौ.मी. क्षेत्रावर कारवाई प्रस्तावित आहे. तर ८४८ चौ.मी. क्षेत्राचे तीन दाखल प्रस्ताव मान्यतेच्या प्रक्रियेत आहे. उर्वरीत क्षेत्र १,८४५ चौ.मी बाबत मा. न्यायालयाची स्थगिती असल्याने त्यावर कारवाई करणे शक्य झाले नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**चंद्रपूरमधील वीज प्रकल्पापासून जवळच्या असलेली बंराज खाण कर्नाटकाला दिल्याबाबत**

**(४८) २६८९२ (१०-०८-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याला स्वस्तात वीजनिर्मितीत करता यावी याकरिता चंद्रपूरमधील वीज प्रकल्पापासून जवळच्या असलेली बंराज खाण देण्याची विशेष खाण वितरण समितीची शिफारस डावलून ती खाण कर्नाटकाला दिली असल्याचे माहे मे, २०१५ निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विजेचे दर कमी व्हावेत म्हणून प्रकल्पासून जास्तीत जास्त जवळच्या खाणी राज्य सरकारला वितरीत करण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी केंद्र सरकारकडे कोणता आक्षेप नोंदविला आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२४-११-२०१५) :** (१) खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ च्या तरतुदी अन्वये केंद्रीय कोळसा मंत्रालयाने मौजे-सोमनाला (लि.) बोंथाळा, चकबरांज, केसुर्ली, चिचोर्डी, बरांज, मोकासा तालुका - भद्रावती, जि.चंद्रपूर येथील कोळसाखंड मे. कर्नाटका पॉवर कॉर्पोरेशन लि. यांना मंजूर केला आहे.

(२) कोळसा वाहतुकीवरील खर्च कमी व्हावा व पर्यायाने विजेचे दर कमी व्हावेत यासाठी कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांनी महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत केंद्रासाठी अंतर्गत कोळसा अदलाबदलीच्या योजनेनुसार (internal Swapping) मे. एम.सी.एल.या ओरिसा राज्यातील दूर अंतरावरील कोळसा कंपनीचा देय कोळसा (Linkage) कमी करुन त्याप्रमाणात मे. वेकोली व मे.एम.ई.सी.एल. या तुलनेने जवळील कोळसा कंपनीच्या खाणींच्या कोळशामधून आवंटीत केला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील बोरिवली विभागातील चारकोप-कांदिवली (पश्चिम) येथे म्हाडाच्या टर्न की प्रोजेक्टबाबत

**(४९) २७९६१ (१०-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरिवली विभागातील चारकोप-कांदिवली (पश्चिम) येथे म्हाडामार्फत टर्न की प्रोजेक्ट राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे, सदर कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या आहेत काय,

(३) असल्यास, उपरोक्त कामाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे तसेच निविदा मंजूर केलेल्या ठेकेदारांच्या कामाचा दर्जा तपासण्यात आला आहे काय,

(४) तसेच सदर प्रकल्पास आवश्यक असणाऱ्या सर्व ना हरकत प्रमाणपत्रे प्राप्त झाली आहेत काय ?

**श्री. प्रकाश मेहता (०३-१२-२०१५) :** (१) होय.

(२) चारकोप, कांदिवली (प.) येथील ५ विविध भुखंडांवर निवासी व अनिवासी गाळे असलेल्या गृहनिर्माण योजना म्हाडामार्फत राबविण्याचे हाती घेण्यात आले आहे. या योजना राबविण्यासाठी कामाचे सर्वेक्षण, मृदा परिक्षण, नियोजन, संरचना, बांधकाम व स्थानिक प्राधिकरण/स्वराज्य संस्थांकडून सदर योजना पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व संबंधित परवानगी मिळविणे या एकत्रित कामासाठी ठेकेदाराची नियुक्ती करणे व त्यांच्यामार्फत कामाची अंमलबजावणी करणे असे या टर्न की प्रोजेक्टचे स्वरुप आहे.

येथील एकूण पाच योजनांसाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(३) सदर कामासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता रु.४३१० लक्ष एवढ्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. सदरहू कामांच्या निविदा मागविण्यात आल्या असून निविदा मंजूर केलेल्या ठेकेदारांच्याबाबतीत निविदा मंजूर करतेवेळी त्यांनी यापूर्वी केलेल्या कामांपैकी काही कामांची पाहणी कार्यकारी अभियंता यांचेमार्फत करण्यात आली आहे तद्नंतरच ठेकेदार निवडीची प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे.
(४) एकूण ५ भूखंडांवरील कामांपैकी २ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली असून, त्यापैकी १ कामाला पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे व १ कामाल अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. उर्वरित ३ कामांपैकी १ काम प्रगतीपथावर असून २ कामांचे नकाशे मुंबई महानगर पालिकेस सादर करण्यात आले आहेत.

---

**म्हाडाच्या जमिनीवरील “एसआरए” योजनेतून मिळणाऱ्या अतिरिक्त घरांचा लाभ खाजगी बिल्डरांना देण्याऐवजी म्हाडाला देण्याबाबत**

**(५०) २७९८९ (१०-०८-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या जमिनीवरील “एसआरए” योजनेतून मिळणाऱ्या अतिरिक्त घरांचा लाभ खाजगी बिल्डरांना देण्याऐवजी म्हाडाला मिळावा या उद्देशाने म्हाडाच्या मालकीच्या जमिनीवर अतिक्रमण होऊन वसलेल्या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन म्हाडामार्फतच करण्याचा निर्णय दोन वर्षापूर्वी शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेतून म्हाडाला मोठ्या प्रमाणात अतिरिक्त घरांचा साठा मिळून सरतेशेवटी ती घरे लॉटरीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना मिळणे अपेक्षित होते तथापि आता शासनाने म्हाडाचा सदरहू निर्णय बदलून या योजना पुन्हा “एसआरए” प्राधिकरणामार्फत राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (२७-११-२०१५) :** (१) हे खरे नाही. शासनाने असा निर्णय घेतलेला नाही. तथापि, म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या जमिनीवरील झोपडयांचे पुनर्वसन म्हाडातर्फे करण्याचा निर्णय म्हाडा प्राधिकरणाच्या दि. ०६.०८.२०१३ च्या ठरावान्वये घेण्यात आला आहे.
(२) व (३) सदर ठराव मंजुरीपूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून म्हाडाच्या जमिनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या अनुषंगाने एकुण ९६ प्रकरणामध्ये म्हाडास परिशिष्ट-२ तयार करण्यास कळविण्यात आले होते. त्यामधील पुनरावृत्ती झालेले ७ प्रस्ताव वगळता उर्वरित ८७ प्रकल्पांपैकी १५ प्रकरणांमध्ये म्हाडातर्फे योजना राबविल्यास हाऊसिंग स्टॅक उपलब्ध होणार नाही असे निदर्शनास आल्याने सदर १५ प्रकरणांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यास म्हाडाने ना हरकत प्रमाणपत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास दिले.

उर्वरित ७२ प्रकरणांपैकी पहाडी, गोरेगाव येथील २२ प्रकरणांमध्ये मा. उच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असल्याने शिल्लक ५० प्रकरणांमध्ये म्हाडाच्या ठरावाप्रमाणे म्हाडाकडून पुनर्विकास करावयाचा होता. तथापि, मा. मुंबई उच्च न्यायालयाने श्री. अवधेश तिवारी विरुध्द महाराष्ट्र शासन या प्रकरणात दिलेले आदेश विचारात घेता सदर ५० प्रकरणांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने यापूर्वीच योजना प्रस्तावित केलेली असल्याने त्यावर म्हाडाकडून योजना राबविता येणार नाही असा ठराव झोपटपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि. ०१.१.२०१४ रोजी मंजुर केला आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.